

**श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील**
**मा. अध्यक्ष,**
**महाराष्ट्र विधानसभा**

| | | |
|---|---|---|
| **जन्म** | : | ३० ऑक्टोबर १९५६. |
| **जन्म ठिकाण** | : | निरगुडसर, तालुका आंबेगाव, जिल्हा-पुणे. |
| **शिक्षण** | : | बी.ए. (ऑनर्स); डिप्लोमा इन जरनॅलिझम; एलएल.एम्. |
| **ज्ञात भाषा** | : | मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : | विवाहित, पत्नी श्रीमती किरण. |
| **अपत्ये** | : | एकूण १ (एक मुलगी). |
| **व्यवसाय** | : | शेती व व्यापार. |
| **पक्ष** | : | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. |
| **मतदारसंघ** | : | १९६-आंबेगाव, जिल्हा पुणे. |
| **इतर माहिती** | : | महाविद्यालयीन जीवनापासूनच राजकारणात तसेच सहकारी चळवळीमध्ये राज्यातील नेत्यांच्या सानिध्यात राहून सक्रिय सहभाग; संस्थापक-अध्यक्ष, राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र, पुणे, या संस्थेमार्फत ग्रामीण, दुर्गम आदिवासी भागातील जनतेच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध उपक्रम राबविले; ग्रामीण भागात दुग्ध व्यवसायास प्रोत्साहन देऊन संस्थांचे जाळे विकसित केले व त्याद्वारे सर्वसामान्य जनता विशेषत: ग्रामीण महिला वर्गाच्या आर्थिक सक्षमीकरणाचे कार्य; यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्रातील अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांशी निकटचा संबंध.<br>संस्थापक-चेअरमन, भीमाशंकर सहकारी साखर कारखाना; १९९०-१९९५, १९९५-१९९९, १९९९-२००४, |

२००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; १९९२-९३ समिती प्रमुख, विधिमंडळ अंदाज समिती; राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे दिल्या जाणाऱ्या महाराष्ट्र विधान सभेतील "**उत्कृष्ट संसदपटू**" या पुरस्काराने १९९७-९८ मध्ये सन्मानित.

ऑक्टोबर १९९९ ते डिसेंबर २००२ उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; डिसेंबर २००२ ते जानेवारी २००३ उच्च व तंत्रशिक्षण आणि ऊर्जा खात्याचे मंत्री; जानेवारी २००३ ते नोव्हेंबर २००४ ऊर्जा व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २००४ ते मार्च २००५ ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळून) व वैद्यकीय शिक्षण खात्याचे मंत्री; मार्च २००५ ते डिसेंबर २००८ ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळून), वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; डिसेंबर २००८ ते ऑक्टोबर २००९ वित्त व नियोजन खात्याचे मंत्री.

मंत्रीपदी कार्यरत असताना महत्त्वपूर्ण धोरणात्मक व उल्लेखनीय निर्णय घेतले, त्यामध्ये प्रामुख्याने '**महाराष्ट्र ज्ञान महामंडळ**' या कंपनीची स्थापना करून गतीने विकास केला, त्यामुळे राज्यात संगणक साक्षरता वाढीचे महत्त्वाचे कार्य होऊ शकले.

विद्युत कायदा २००३ ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी केली; ऊर्जा क्षेत्रात राज्याला योग्य दिशा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विभाजन करुन सूत्रधारी कंपनी, महानिर्मिती, महापारेषण, व महावितरण या चार कंपन्यांची स्थापना केली व ऊर्जा विकासासाठी रोडमॅप केला, ६००० मेगावॉटचे प्रकल्प उभारण्याचे व विद्युत पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम केले, त्यामुळे २०१२ पर्यंत राज्य भारनियमनमुक्त होण्याचा मार्ग खुला झाला.

उच्च शिक्षणामध्ये गुणात्मकता येण्यासाठी नवीन पद्धती, ॲक्रीडिशन पद्धती प्रस्थापित केली.

ऑक्टोबर २००९ मध्ये सलग पाचव्यांदा आंबेगाव विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित; ११ नोव्हेंबर २००९ रोजी महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षपदी बिनविरोध निवड.

**परदेश प्रवास** : १९८५ मास्को-रशिया, १९८९ उत्तर कोरिया-प्यॉगयॉंग येथील आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवात भारताचे प्रतिनिधीत्व तसेच, १९९७ मध्ये राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेमार्फत युनायटेड किंगड्म, बेल्जियम, नेदरलँड, स्वित्झरलँड व फ्रान्स इत्यादी देशांचा अभ्यास दौरा; राष्ट्रकुल संसदीय

मंडळाच्या राष्ट्रकुलातील देशांमधील पीठासीन अधिकारी परिषदांत सहभाग.

**छंद** : प्रवास व वाचन.

**पत्ता** : (१) मु.पो. निरगुडसर, तालुका आंबेगाव,
जिल्हा पुणे.
(२) "शिवगिरी", डॉ. नारायण दाभोळकर मार्ग,
मलबार हिल, मुंबई.
दूरध्वनी : कार्यालय - २२०२३१०१
फॅक्स - २२०२४३२०
दूरध्वनी : निवास - २३६३११३६
फॅक्स - २३६८६७६६